जा.क्र.राआपो/प्रसूती/ 78 /२०२२
स्त्रीरोग व प्रसूतीतंत्र विभाग,
रा.आ.पोदार वैद्यक महाविद्यालय,
वरळी, मुंबई -१८
दिनांक : 31/03 /२०२२

प्रति,

मा.अधिष्ठाता,
रा.आ.पोदार वैद्यक महाविद्यालय
वरळी, मुंबई -१८

विषय : **आजादी का अमृत महोत्सव अंतर्गत दि.०५/०३/२०२२ रोजी AYUSH EXPO CME चे आयोजन नेहरु सेंटर, वरळी, मुंबई येथे करण्यात आले त्याबाबतचा अहवाल**

मा. महोदय,

उपरोक्त विषयान्वये **आजादी का अमृत महोत्सव अंतर्गत दिनांक ०५ मार्च २०२२ रोजी AYUSH EXPO व CME** संपन्न झाली. स्त्रीरोग व प्रसूतीतंत्र विभाग, म.आ.पोदार रुग्णालय व TRINITY GROUP याच्याबतीने सदर CME चे आयोजन करण्यात आले होते. नेहरु सेंटर, वरळी, मुंबई येथे सकाळी १०.३० ते ५.३० यावेळेत कार्यक्रम संपन्न झाला.

CME चे उद्घाटन रा.आ.पोदार वैद्यक महाविदयालयाचे प्रतिनिधी म्हणून मा.प्रशासकीय अधिकारी श्री.नरसू पाटील तसेच TRINITY GROUP चे श्री.जॉन जोसेफ यांच्या हस्ते झाले. CME च्या शुभारंभ प्रसंगी श्री.नरसू पाटील, प्रशासकीय अधिकारी, मा. वैद्य मनोज गायकवाड, विभागप्रमुख व प्राध्यापक स्त्रीरोग व प्रसूतीतंत्र विभाग, वैद्या भाग्यश्री खोत, सहयोगी प्राध्यापक, वैद्य प्रशांत दळवी, सहयोगी प्राध्यापक, वैद्या अम्रिता मिश्रा, सहाय्यक प्राध्यापक, वैद्या रुतुजा गायकवाड, सहाय्यक प्राध्यापक हे मान्यवर उपस्थित होते.

CME चे सूत्रसंचालन वैद्या रुतुजा गायकवाड व पदव्युत्तर विदयार्थिनी वैद्या श्रुतिका सुरळके यांनी केले. सदर CME दोन सत्रांमध्ये पार पडली.

प्रथम सत्रामध्ये -

१)वैद्या प्रिया वलवटकर, सहयोगी प्राध्यापक, आयुर्वेद महाविदयालय, सायन यांनी **विवाहपूर्व समुपदेशन** या विषयावर व्याख्यान दिले.

२) वैद्य मंगेश पाटील, सहयोगी प्राध्यापक, वाय.एम.टी. खारघर यांनी **गर्भधानविधी**

३)वैद्य विष्णु बावणे, प्राध्यापक व विभागप्रमुख बी.आर.हारणे आयुर्वेद मेडिकल कॉलेज, ठाणे यांनी **गर्भिणी परिचर्या** या विषयावर व्याख्यान दिले.

४)वैद्य मनोज गायकवाड, विभागप्रमुख व प्राध्यापक, स्त्रीरोग व प्रसूतीतंत्र विभाग रा.आ. पोदार वैद्यक महाविद्यालय वरळी, मुंबई यांनी **रुग्णानुभववार** व्याख्यान दिले.

Scanned with CamScanner

प्रथम सत्राचे **सत्राध्यक्ष पद वैद्य मनोज गायकवाड** आणि **उपसत्राध्यक्ष पद वैद्या भाग्यश्री खोत** यांनी भूषविले.

द्वितीय सत्रामध्ये -

१) वैद्या जयश्री पाटील, प्राध्यापक व विभागप्रमुख डी.वाय.पाटील आयुर्वेद महाविदयालय, पिंपरी, पुणे यांनी **गर्भधारणा - उपदेश** या विषयावर व्याख्यान दिले.

२) वैद्या सविता अमर , योगप्रशिक्षक, रा.आ.पोदार वैद्यक महाविदयालय, वरळी यांनी **महिलांचे स्वास्थ आणि योगोपचार** या विषयावर मार्गदर्शन केले.

३) युनानी डॉ. हुमायरा अब्दुल हमीद अन्सारी (एम.डी.), सहयोगी प्राध्यापक यांनी **युनानी चिकित्सा पद्धती** या विषयावर व्याख्यान दिले.

द्वितीय सत्राचे **सत्राध्यक्ष पद वैद्य प्रशांत दळवी** आणि **उपसत्राध्यक्ष पद वैद्या अम्रिता मिश्रा** यांनी भुषविले.

या CME मध्ये २५७ विदयार्थ्यांनी सहभाग घेतला तसेच याप्रसंगी आयुष प्रदर्शनाला अनेक देशी-विदेशी नागरिकांनी भेट दिली.

आपल्या माहितीस्तव व योग्य त्या कार्यवाहिस्तव सादर

आपला विश्वासु

विभागप्रमुख
स्त्रीरोग व प्रसूतीतंत्र विभाग
रा.आ.पोदार वैद्यक महाविद्यालय,
वरळी, मुंबई -१८

प्रत -

डॉ. राजेश्वर रेड्डी, प्राध्यापक, शल्यतंत्र विभाग
अध्यक्ष आजादी का अमृत महोत्सव समिती

Scanned with CamScanner

आजादी का अमृत महोत्सव अंतर्गत
दि.०५/०३/२०२२ रोजी AYUSH EXPO CME चे आयोजन
नेहरु सेंटर,वरळी, मुंबई येथे करण्यात आले.










Scanned with CamScanner